पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८, लेखा विभाग
क्रमांक/लेखा/कावि/२४५/२०१४
दिनांक :-२३/०४/२०१४

**विषय :- कर्मचारी मासिक वेतन / सर्व मानधन बिले ईसीएस द्वारे अदा करणेबाबत....**

परिपत्रक,

माहे डिसेंबर २०१३ पासून सर्व पुरवठादार / ठेकेदार यांची देयके ECS द्वारे अदा करणेत येत आहे. दिनांक २६/१२/२०१३ चे KRA सभेमध्ये सर्व कर्मचारी यांची मासिक देयके ECS द्वारे अदा करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

सबब, सदर परिपत्रकाद्वारे सर्व अधिकारी कर्मचारी यांना कळविणेत येते की माहे मे २०१४ पासून कर्मचा-यांचे मासिक वेतन ECS द्वारेच अदा करणेत येणार आहे, त्यासाठी सर्व अधिकारी/ कर्मचारी यांचे खाते ज्या बँकेत ECS ची सुविधा आहे अशाच बँकेत असणे आवश्यक आहे. तरी ज्या कर्मचा-यांचे बँक खाते सहकारी बँकेत आहे व अशा बँकेकडे आय.एफ.एस.सी. संकेतांक नाही अशा कर्मचा-यांनी सदरची सुविधा असलेल्या बँकेत आपले खाते उघडण्यात येऊन पगार बिल संगणक प्रणालीमध्ये बँकेची नोंद १० मे २०१४ पुर्वी घेण्यात यावी. तसेच मानधन कर्मचारी, घंटागाडी ठेकेदार यांचे वैयक्तिक ECS भरलेले फॉर्म्स लेखा विभागाकडे दिनांक १० मे २०१४ पुर्वी जमा करणेत यावी. माहे मे २०१४ चे वेतन ECS द्वारेच अदा करणेत येणार असल्याने वेळेत माहिती सादर करणेत यावी. सदर माहिती अभावी वेतनास उशीर झाल्यास लेखा विभाग त्यास जबाबदार राहणार नाही.

**मुख्यलेखापाल**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

प्रति,
सर्व संबंधित विभाग

सदरचे परिपत्रक सर्व कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देण्यात यावे.

प्रत :- १) मे.प्रॉबिटी सॉफ्टवेअर प्रा.लि.,
२) ई-गव्हर्नन्स विभाग, पुढील कार्यवाहीसाठी